# अवैध बांगलादेशी नागरिक एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात

## पोखर्डी शिवारातून तिघांना अटक; बनावट कागदपत्रांसह भारतात प्रवेश

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोखर्डी (ता. अहिल्यानगर) गावाच्या शिवारात अवैधपणे वास्तव्यास असलेल्या तीन बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांच्याजवळून बनावट ओळखपत्रे मिळून आली आहेत.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यात बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या विदेशी नागरिकांविरुद्ध विशेष मोहीम राबवण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सपोनि माणिक बी. चौधरी यांना २६ जून रोजी बातमीदारामार्फत माहिती मिळाली की पोखर्डी गावाजवळील वारुळे वस्तीमध्ये काही बांगलादेशी नागरिक विनापरवाना वास्तव्यास आहेत. त्यानुसार, एमआयडीसी पोलीस, दहशतवाद विरोधी पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला. तेथे खडी क्रशरजवळील एका सिमेंट बांधकाम असलेल्या खोलीत तीन संशयित मिळून आले. त्यांच्याकडे विचारपूस केल्यानंतर त्यांनी आपली नावे जहांगिर अबुताहेर शेख (वय ३४, रा. चातपुर ठाणा हजीगंज, राज्य चेटोग्राम, बांगलादेश), हनीफ अब्दुल खलीद शेख (वय ४०, रा. खजीर खाली, थाना शेनबाग, पोस्ट शेबरहाट, बांगलादेश) व मुश्रफ हबीब शेख (वय ४०, रा. चातपुर ठाणा हजीगंज, राज्य चेटोग्राम, बांगलादेश) अशी सांगितली. यांच्याकडे भारतात येण्यासाठी आवश्यक असलेले कोणतेही व्हिसा अथवा परवानगीपत्र नव्हते. त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. तपासाअंती त्यांच्याकडे बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड व इतर खोट्या कागदपत्रांचा संच सापडला. पोलिसांनी सर्व कागदपत्रे जप्त केली असून, तिघांवर एमआयडीसी पोलीस ठाण्यामध्ये विदेशी नागरिक कायदा व फसवणूकसंबंधी कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, नगर ग्रामीण विभागाचे प्रभारी उपविभागीय अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक बी. चौधरी, पोसई मनोज मोंढे, अंमलदार राकेश खेडकर, राजु सुद्रीक, किशोर जाधव, सुरज देशमुख, जयसिंग शिंदे, शेरकर, दहिफळे, राहुल गुंडू यांच्या पथकाने केली. या मोहिमेस सदन कमांड मिलिटरी इंटेलिजन्स, अहिल्यानगर यांचीही महत्त्वपूर्ण मदत लाभली.

# शुभांशू शुक्ला यांचे मिशन स्पेस यशस्वी



**नवी दिल्ली–** भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला अंतराळ स्थानकात पोहोचले आहेत. स्थानकावर उपस्थित अंतराळवीरांनी या चारही अंतराळवीरांचे स्वागत केले. अंतराळ स्थानकात पोहोचण्याचे भारताचे स्वप्न साकार झाले आहे. पुढील १४ दिवसांसाठीच ते स्थानकात राहतील.

शुभांशू शुक्ला यांना घेवून गेलेले ॲक्सिओम–४ (ॲक्स–४) मोहिमेअंतर्गत, स्पेसएक्स ड्रॅगन कॅप्सूल नियोजित वेळेच्या २० मिनिटे आधी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात डॉक झाले. हे अंतराळयान ४१८ किमी उंचीवर २८,००० किमी प्रती तास वेगाने पृथ्वीभोवती फिरत आहे. प्रक्षेपणानंतर, त्याने सुमारे २६ तासांचा प्रवास पूर्ण केला. यासाठी, अंतराळयान आयएसएसच्या कक्षेशी जुळवून घेत आहे.

# दारुसाठी पैसे दिले नाही म्हणून साई संस्थान कर्मचाऱ्यावर चाकूहल्ला

## चार आरोपींविरुद्ध शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



**शिर्डी (प्रतिनिधी)–** दारू पिण्यासाठी पैसे दिले नाही म्हणून आउटसोर्समध्ये काम करणाऱ्या साहेबराव झाडे या युवकावर शिर्डीतील चार तरुणांनी चाकू हल्ला करत त्याला गंभीर जखमी केले. ही घटना बुधवारी रात्री घडली. या प्रकरणात शिर्डी पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

साहेबराव झाडे याने शिर्डी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, बुधवारी दुपारी १ ते ९ या वेळेत मी साईबाबा संस्थानमध्ये आऊटसोर्स कर्मचारी म्हणून संस्थांच्या बसवर मदतनीस म्हणून ड्युटी करीत होतो. रात्री ९ नंतर ड्युटी संपवून घरी जात असताना चौधरी वस्ती, श्रीराम नगर येथे माझ्या ओळखीचा अनिकेत संतोष पोटे याने मला रस्त्यात अडवून तू मला दारू पिण्यासाठी पैसे दे असे म्हणत पैशाची मागणी केली. मी त्याला माझ्याकडे पैसे नाही असे सांगितले. त्यावेळी अनिकेत पोटे याने माझे खिसे चापसायला सुरुवात केली. मी त्याला विरोध केला, म्हणून त्याने कमरेला असलेला चाकू काढून माझ्या हातावर मारून मला जखमी केले. त्याच्यासोबत असलेल्या मित्र योगेश गाडे याने त्याच्या हातात असलेला रॉड माझ्या पाठीत मारला. तसेच रोहित चाबुकस्वार व सतीश अनारसे यांनी मला लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. सतीश अनारसे याने माझ्या पॅन्टच्या खिशातील दोन हजार रुपये काढून घेतले. त्या दरम्यान मी आरडाओरडा केल्याने आजूबाजूचे लोक जमा झाले असता त्यांनी तिथून पळ काढला. पळून जाताना तू जर पोलीस स्टेशनला तक्रार केली तर तुला जिवंत सोडणार नाही, अशी त्यांनी मला धमकी दिली, अशी फिर्यात साहेबराव झाडे या युवकाने शिर्डी पोलीस ठाण्यात दिली. त्यावरून पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांनी चाकू हल्ला व मारहाण करणाऱ्या चार आरोपींविरोधात शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# फडणवीसांच्या धमकीने आमची झोप उडाली



**मुंबई–** शक्तीपीठ महामार्ग मुद्यात राजकारण आणाल तर याद राखा, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना ठणकवले होते. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'आता आमच कसं व्हायचं?' असा खोचक टोला लगावल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत शक्तीपीठ महामार्गासाठी भूसंपादनाच्यादृष्टीने २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापू लागले असून काँग्रेससह विरोधकांनी या प्रकल्पावर जोरदार टीका केली आहे. नागपूर–गोवा शक्तीपीठ महामार्ग हा महायुती सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. मात्र, कोल्हापूर, धाराशिव आणि सोलापूर परिसरातील शेतकऱ्यांनी या महामार्गाला

### शरद पवारांचा खोचक टोला

तीव्र विरोध दर्शवला होता. परिणामी, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रकल्पाला तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. मात्र, विधानसभेत बहुमत मिळाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महामार्गाच्या कामास पुन्हा गती देत हिरवा कंदील दाखवला. त्यावर शरद पवार म्हणाले की, शक्तीपीठ महामार्गाचा विषय मला समजून घ्यायचा आहे. कोल्हापूरच्या लोकांबरोबर मी बोलणार आहे. त्यानंतर राज्य सरकारने आम्हा लोकांना त्याची माहिती देण्याची तयारी दाखवली तर तेही समजून घेण्याचा माझा विचार आहे. देवेंद्र फडणवीसच्या धमकीमुळे आमची झोप उडाली आहे, असा खोचक टोला त्यांनी यावेळी लगावला. फडणवीसांच्या याद राखा, या इशाऱ्यावर शरद पवारांनी आता आमच कसं व्हायचं? असा खोचक टोला लगावल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

**विरोधासाठी विरोध नाही**

शरद पवार पुढे म्हणाले की, हा प्रकल्प काय आहे? हे आधी मी समजून घेईन. त्याची आवश्यकता आहे का? ते समजून घेईन. त्यासाठी सरकारने आम्हाला माहिती दिली तर ती देखील मी घेणार आहे. त्या भागातला शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जातात, त्या भागातले लोकप्रतिनिधी जे जाहीर बोलतायेत त्यांची मतं आणि त्यांचा आग्रह हा समजून घ्यावा लागेल. मी कधीच विरोधासाठी विरोध करणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

**विद्यार्थ्यांवर किती भार टाकणार?**

पाचवीनंतर हिंदी शिकायला काही हरकत नाही. देशातील एक मोठा वर्ग हिंदी भाषा बोलतो, त्यामुळे हिंदी भाषेला एकदमच साईडचं समजण्याचं कारण नाही. पण, लहान मुलांच्या एका विशिष्ट वयामध्ये किती भाषा ते आत्मसात करू शकतात. त्यांच्यावर किती भाषांचा भार टाकावा, याचा देखील विचार करावा लागेल, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली आहे. याबाबत ठाकरे बंधु जे बोलतात त्यांचे स्टेटमेंट काही चुकीचं नाही, असे शरद पवारांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगीतले.

# चीनचे डास ड्रोन

## नागरिकांची होणार हेरगिरी

**नवी दिल्ली –** चीन काही दिवसातच डासांच्या आकाराचा नवीन ड्रोन लाँच करत आहे. चीन आता अत्याधुनिक शस्त्रांची निर्मिती करत आहे. याबाबत चीनच्या सरकारी माध्यमांनी एक व्हिडीओ शेअर केला आहे.

व्हिडिओमध्ये शास्त्रज्ञ डासांसारखा दिसणारा रोबोट हातात धरलेले दिसत आहेत. हे ड्रोन अनेक प्रकारच्या लष्करी आणि इतर मोहिमांसाठी वापरले जातील. अशा ड्रोनचा वापर लोकांचे खासगी संभाषण ऐकण्यासाठी, लोकांचा मागोवा घेण्यासाठी किंवा पासवर्ड चोरण्यासाठी केला जाऊ शकतो, असा दावा तज्ज्ञांनी केला आहे. याबाबत संरक्षण तज्ज्ञ टिमोथी हीथ यांनी इशारा दिला आहे. अशा उपकरणांचा वापर पासवर्डसारखी वैयक्तिक माहिती चोरण्यासाठी केला जाऊ शकतो.



**श्रीरामपूर येथील गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने शंभरहून अधिक गरीब विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. संस्थेचे चेअरमन ॲड. शरद सोमाणी, व्हा. चेअरमन नंदकिशोर नवले, संचालक मंडळ यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.**

# एसटीच्या २ हजार बसेस भंगारात

**मुंबई–** राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाच्या २ हजार बसेस आता भंगारात काढण्यात येणार आहेत. धातू भंगार व्यापार महामंडळाच्या (एमएसटीसी) माध्यमातून या बसचा लिलाव करण्यात येणार आहे. राज्यभरातील ३२ आगारांमध्ये सध्या या बसेस उभ्या असून, त्या मुंबईमध्ये उच्च बोलीदाराला विकण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

एसटी महामंडळाच्या ताफ्यात सुमारे १४ हजार बसेस असून, वयोमर्यादेमुळे जुन्या झालेल्या बसेस भंगारात काढण्यास सुरुवात केली आहे. दरवर्षी सुमारे २ हजार बसेस भंगारात निघत असून, येत्या दोन ते तीन वर्षांत सुमारे ५ हजार बसेस भंगारात निघणार आहेत. पूर्वीच्या लिलावात २ ते २.५ लाख प्रत्येक बस, असा महसूल महामंडळाला मिळाला होता. राज्य परिवहन विभागाने (आरटीओ) राज्यातील सर्व सार्वजनिक प्रवासी वाहतूक महामंडळांना लिलावामध्ये केवळ राज्यातील बोलीदारांनाच सहभागी करण्याचे निर्देश दिले आहेत.

पान १ वरुन

## हिंदी सक्तीविरोधात आरपारची लढाई

हिंदी किंवा इतर कोणत्याही भाषेची सक्ती महाराष्ट्रात होऊ देणार नसल्याचे सांगताना राज ठाकरे म्हणाले, मी हिंदी सक्तीचा विरोध करण्यासाठी येत्या ५ जुलै रोजी गिरगाव चौपाटी ते आझाद मैदान असा मोर्चा काढणार आहे.

राज ठाकरे यांनी सर्व राजकीय पक्षांनाही या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. मोर्चासाठी उद्धव ठाकरे यांनाही आपण बोलावणार का, या प्रश्नावर महाराष्ट्रातील राजकीय पक्षांत ते पण आलेच ना असा प्रतिप्रश्न करत, त्यांच्याशीही मी बोलणार आहे. माझी माणसे त्यांच्या माणसांशी बोलतील, असे राज ठाकरे म्हणाले. मी आधीच स्पष्ट केले होते, की कोणत्याही वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. हे माझे पहिले वाक्य होते ते तुम्हाला येत्या ५ तारखेला कळेल, असे सांगत राज ठाकरे यांनी या मोर्च्याच्या निमित्ताने जोरदार शक्तिप्रदर्शनाचे संकेत दिले.

**हिंदी सक्ती धोरण उद्धव ठाकरेंनी स्वीकारले– सावंत**

राज्यात शालेय शिक्षणात हिंदी भाषा सक्तीचे धोरण महाविकास आघाडी सरकारच्या काळात उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना स्वीकारले होते. डॉ. माशेलकर समितीने इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत मराठी, इंग्रजी आणि हिंदी या तीन भाषा सक्तीने शिकवल्या पाहिजेत, असा प्रस्ताव ठाकरे यांनीच कॅबिनेटमध्ये स्वीकारला होता. मात्र आता हिंदी सक्ती नसताना देखील जाणीवपूर्वक हिंदी भाषेवरुन राजकारण केले जात आहे, अशी टीका उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केली.

**कोणताही झेंडा नाही**

या मोर्चात कोणत्याही पक्षाचा झेंडा नसेल. तो मोर्चा मराठी माणसाचा असेल, मोर्चाचे नेतृत्व मराठी माणूसच करेल. शिक्षणतज्ज्ञ, भाषातज्ज्ञ, साहित्यिक यांच्याशी बोलणार आहे. माझे पत्र जाणार आहे. सर्व पालक विद्यार्थी यांना आमंत्रण देत आहोत. सरकारला कळू दे महाराष्ट्राच्या मनात काय आहे ते. महाराष्ट्राचे मराठीपण घालविण्यासाठीचा हा कट आहे. हा कट उध्वस्त करण्यासाठी सर्व मराठी जनांनी या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहनही राज ठाकरे यांनी केले.

**त्रिभाषा सूत्रावर राज्य सरकार ठाम**

राज्य सरकार मात्र त्रिभाषा सूत्रावर ठाम आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी तृतीय भाषा म्हणून कोणत्याही भाषेची सक्ती करणार नसल्याचा पुनरुच्चार करताना पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी तिसऱ्या भाषेचे शिक्षण हे मौखिक स्वरूपात दिले जाणार असल्याची माहिती गुरुवारी दिली. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करता आपले विद्यार्थी कुठेही कमी पडू नयेत या हेतूने राज्य सरकारने त्रिभाषा सूत्र स्वीकारल्याचे सांगत भुसे यांनी सरकारच्या निर्णयाचे समर्थन केले.

## सोमवारपासून पावसाळी अधिवेशन

राज्यातील विरोधी पक्षांसह मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही सरकारच्या निर्णयाला जोरदार विरोध केला आहे.

सरकारने सुरुवातीला हिंदी विषय सक्तीचा केला होता. मात्र नंतर टीकेच्या लाटेमुळे ही सक्ती मागे घेण्यात आली. त्यानंतर सरकारने पूरक भाषा म्हणून हिंदी शिकवण्याचा पर्यायी प्रस्ताव मांडला. तरीही शिक्षकांची अपुरी संख्या, संसाधनांचा अभाव आणि स्थानिक भाषांचा अपमान केल्याचे आरोप करत विरोधक पुन्हा आक्रमक झाले. या पार्श्वभूमीवर अधिवेशनात हिंदी विषयावरून सरकारला घेरण्याची विरोधकांची तयारी असणार आहे. शक्तीपीठ महामार्गाचा मुद्दाही विरोधकांच्या हातात असणार आहे. सरकारने अलीकडेच शक्तीपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला मंजुरी दिली. कोल्हापूर, धाराशिव, बीड आणि इतर जिल्ह्यांतून हा प्रकल्प जाणार आहे. या महामार्गासाठी अनेक शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी संपादित केल्या जाणार आहेत. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांकडून याला तीव्र विरोध करत आहेत. या प्रकल्पावरून सरकार आणि विरोधक यांच्यात सभागृहात चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे. विरोधक भूसंपादनाची प्रक्रिया थांबवण्याची मागणी करत सरकारला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करतील. राज्यात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या अंमलबजावणीवरूनही विरोधक नाराज आहेत. अनेक ठिकाणी लाभार्थ्यांना वेळेत मदत मिळत नसल्याची तक्रार आहे. यावर प्रहारचे बच्चू कडू यांनीही आंदोलन केलं. आता या मुद्द्यामुळे वातावरण तापलं आहे. त्यामुळे पावसाळी अधिवेशन गाजण्याची शक्यता आहे.

## पशुसंवर्धन उपायुक्तांवर आता...

पशुसंवर्धन विकास अधिकारी हे पद संपुष्टात येणार आहे. त्याऐवजी या पदाचे काम आता उपयुक्त पशुसंवर्धन यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. तसेच या पदावर आता जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे सहआयुक्त (नाशिक) यांचे दुहेरी नियंत्रण राहणार आहे.

गेल्या सात ते आठ महिन्यांपासून राज्यातील पशुसंवर्धन उपायुक्त, जिल्हा परिषदेतील पशुसंवर्धन विभाग आणि राज्य सरकारकडील दुग्ध व्यवसाय विभागाचे एकत्रीकरणाची वारे सुरू होते. या एकत्रिकरणानूसार आता प्रत्यक्षात कार्यवाहीला सुरूवात झाली आहे. यामुळे जिल्हा परिषदेत १९६२ च्या पंचायत राज स्थापनेपासून असणारा पशुसंवर्धन विभाग आता उपायुक्त पशुसंवर्धन विभाग यांच्या नियंत्रणात येणारा आहे. असे असले तरी पशूसंवर्धन विभागासह ग्रामविकास विभागाचे जिल्हास्तरावरील प्रमुख असणारे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे देखील या विभागावर थेट नियंत्रण राहणार आहे.

याबाबतच्या आदेश राज्याचे पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी काढले आहेत. या आदेशात १ जुलै २०२५ पासून जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाचे काम उपायुक्त पशुसंवर्धन हे पाहणार आहेत. तसेच जिल्हा परिषदेकडे असणारे जिल्हा पशू संवर्धन विकास अधिकारी या पदाचे समायोजन करण्यात येणार आहे. दरम्यान, राज्य सरकारने यापूर्वीच तालुका पातळीवर तालुका लघूचिकित्सालय अधिकारी आणि तालुका पशूसंवर्धन अधिकारी वर्ग एक असे पद निर्माण केलेले आहे. लवकरच ही पदे कार्यान्वित करण्यात येणार असून या ठिकाणी सेवाज्येष्ठनेते जिल्हा परिषेदच्या पूशसंवर्धन विभागातील डॉक्टरांचे या ठिकाणी समायोजन करण्यात येणार आहे. या पदावरील जनावरांच्या डॉक्टरांच्या अधिकारात तालुक्यातील पूशधनासोबत दुग्ध व्यवसाय, त्यात होणारी भेसळ रोखणे, पशूच्या खाद्याची कारखाने याचे नियंत्रण येणार आहे. पशूसंवर्धन विभागात हा आता मोठा बदल होणार आहे.

**पशूसंवर्धन अधिकाऱ्यांची श्रेणी वाढली**

यापूर्वी जिल्हा परिषदेच्या पूशसंवर्धन विभागात जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी या पदावर वर्ग एक कनिष्ठ स्तरातील अधिकाऱ्यांची नियुक्त होत होती. मात्र, आता या पूढे या पदावर वर्ग एक वरिष्ठ स्तर म्हणून अधिकाऱ्यांची बदली होणार आहे. मात्र, असे असे असले तरी आता या अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र संबंधीत तालुक्यापूर्ते मर्यादित राहणार आहे.

**या योजना येणाऱ्या उपायुक्तांच्या अखत्यारित**

उपायुक्त पशूसंवर्धन अधिकारी यांच्या अखत्यारित आता राज्य शासनाकडील योजना दुधाळ जनावरांच्या गटाचे वाटप, कुकूट पक्षी वाटप, शेळी गट वाटप, केंद्र पुरस्कृत योजना, राष्ट्रीय पशुधन अभियान, राष्ट्रीय गोकुळ मिशन, राष्ट्रीय कृषी विकास योजना, स्मार्ट योजना, पशूगणना, चारा उत्पादन, महाराष्ट्र पाणी कल्याण मंडळ, श्वान प्रजनन व विपणन केंद्र यांची नियमानूसार नोंदणी विषयी सनियंत्रण या जिल्हा परिषदेकडील सर्व योजनांचे समायोजन करण्यात येणार आहे.

## सह्याद्री पाणलोटात पावसाचा जोर...

कायम राहिला तर दोन्ही धरणे जुलै महिन्यातच पूर्ण क्षमतेने भरतील, असा विश्वास व्यक्त होत आहे. दरम्यान, दारणा, गंगापूरच्या पाणलोटात काल दिवसभर पावसाच्या हलक्या सरींचे आगमन होत होते. गोदावरीत काल सायंकाळी १५ हजार ७७५ क्यूसेक वेगाने विसर्ग सुरू होता.

दोन दिवस पावसाचा जोर ओसल्याने धरणांत धिम्या गतीने पाणी येत होते. मात्र, बुधवारी रात्रीपासून पावसाचा जोर वाढल्याने पाण्याची आवक वाढली आहे. गुरुवारी सकाळी सहा वाजेपर्यंत (२४ तासात) भंडारदरा धरणात २८२ तर निळवंडेत ९६ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली. याचबरोबर मुळा नदीवरील १९१ दलघफू क्षमतेचे आंबित धरण सर्वप्रथम भरल्यानंतर ६०० दलघफू क्षमतेचे पिंपळगाव खांड धरण, १८३ दलघफू क्षमतेचे कोथळे व १५५ दलघफू क्षमतेचे शिरपुंजे धरण आधीच ओव्हर फ्लो झाले आहे. कृष्णावंती नदीवरील वाकी जलाशय व प्रवरा नदीला मिळणाऱ्या टिटवी शिवारातील ३०३ दलघफू क्षमतेचा टिटवी लघु बंधारा पूर्ण क्षमतेने भरून ओसंडून पाणी वाहत आहे. हे पाणी पुढे प्रवरेवरील निळवंडे धरणात येत असून या धरणात नवीन पाणीसाठा झपाट्याने वाढत आहे. तसेच आढळा मध्यम प्रकल्पाचा पाणीसाठाही ८३.२१ टक्के झाला आहे. दरम्यान, एक आठवड्यापासून घाटघर, रतनवाडी, साम्रद, पांजरे या येथे मुसळधार पाऊस कोसळत असून भात आवणीस लवकरच वेग येणार आहे. तर धरण पाणीसाठ्यामध्ये झपाट्याने वाढ होत असल्याने शाखा अभियंता प्रवीण भांगरे, वसंत भालेराव यांच्यासह जलसंपदा विभाग लक्ष ठेऊन आहे. दरम्यान, २४ तासात भंडारदरा ७५ मिमी, घाटघर ८९, पांजरे ७८, रतनवाडी १०१, वाकी ४९, निळवंडे ३, अकोले १ मिमी पावसाची नोंद झाली.

**७ टीएमसी जायकवाडीच्या दिशेने**

राहाता तालुका प्रतिनिधीने दिलेल्या वृत्तानुसार दारणा धरणाच्या पाणलोटात अधून–मधून पावसाच्या हलक्या सरींचे आगमन होत होते. नवीन पाण्याचे आगमन काहीसे कमी झाल्याने दारणा धरणाचा विसर्ग ३,५३६ क्यूसेकवर आहे. पाण्याची आवक घटल्याने गंगापूरचा विसर्ग १,७६० क्यूसेकवर स्थिर ठेवण्यात आला आहे.

काल दारणा व गंगापूर दोन्ही धरणांच्या परिसरात पावसाचे अधून–मधून आगमन होत होते. काल सकाळपर्यंत दारणा धरणात २६१ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली. १ जूनपासून या धरणात ४ टीएमसी पाणी नव्याने दाखल झाले आहे. दारणा समूहातील भावली धरण ७६.२२ टक्के भरले आहे. वाकी ५७.६६ टक्के, भाम धरणात ५७.८३ टक्के भरले आहे.

गंगापूर समूहातील गंगापूर धरणाच्या पाणलोटात काल हलक्या सरींचे आगमन सुरू होते. काल सायंकाळी ६ वाजता या धरणातून १,७६० क्यूसेकने विसर्ग सुरू होता. गंगापूर समूहातील गंगापूरचा साठा ५९.०१ टक्के, कश्यपी ५३.८३ टक्के, गौतमी गोदावरी ३६.६७ टक्के असा पाणीसाठा आहे. अन्य धरणांचा साठा असा – मुकणे ५१.११ टक्के, वालदेवी ५६.५८ टक्के, कडवा ४७.१० टक्के, आळंदी ४७.०६ टक्के, भोजापूर ८१.७२ टक्के, पालखेड ६६ टक्के. दारणा ३,५३६, गंगापूर १,७६०, कडवा ७९५, पालखेड ४,३३८ क्यूसेकने धरणातून पाण्याची आवक सुरू असल्याने नांदूरमधमेश्वर बंधाऱ्यातून जायकवाडीच्या दिशेने गोदावरीत १५,७७५ क्यूसेकने विसर्ग सुरू होता. काल सकाळी ६ वाजेपर्यंत एकूण या बंधाऱ्यातून गोदावरीत जायकवाडीच्या दिशेने ७.७ टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे.

## मुळा धरणाचा साठा ४२ टक्के

गुरुवारी सकाळी ३८२२ क्यूसेसचा तर संध्याकाळी ३४१६ क्यूसेकने धरणाकडे विसर्ग सुरू होता. गेल्या २४ तासात काल सायंकाळपर्यंत मुळा धरणात २३८ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली तर यावर्षी धरणात २ हजार ८०३ दलघफू नवीन पाणी आले. २६ टीएमसी क्षमतेच्या मुळा धरणाचा पाणीसाठा ११ हजार ७०९ दलघफू झाला (४२ टक्के) आहे.

## अवकाळीमध्ये १६ कोटी ६८...

अवकाळी जोरदार सुरुवात झाली. यात उन्हाळ्याच्या उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळतांनाच दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मे महिन्यांत झालेल्या पावसाने जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातील ७४४ गावातील शेतकऱ्यांना ६ हजार ५२१.३७ हेक्टरवर अधिक फटका बसला. अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाल्यामुळे शेतामध्ये जून महिन्याच्या सुरुवातीपर्यंत पाणी साठलेले होते. परिणामी, अनेक ठिकाणच्या शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी शेतीची मशागत करता आली नाही, तसेच बागायती आणि फळबाग असलेल्या शेतामध्ये अनेक दिवस पाणी साठून राहिल्याने झाडांना बाधा पोहोचली. अवकाळी पाऊस झाल्यानंतर महसूलसह कृषी कर्मचाऱ्यांनी बांधावर जाऊन पीक पंचनामे केले. बहुतांश ठिकाणीचे वाफसे झाले नसल्यामुळे पंचनामे करण्यास विलंब झाला. संपूर्ण ठिकाणचे अचूक पंचनामा रिपोर्ट आल्यानंतर त्याचा अहवाल शासनास पाठविण्यात आला आहे.

जिल्हा प्रशासनातर्फे १६ हजार १७७ शेतकऱ्यांच्या नुकसानीपोटी १६ कोटी ६८ लाख रुपयांची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. यात १ हजार १९३.१९ हेक्टरवरील फळपिकांचा समावेश असून ४ कोटी २९ लाख रुपये शासनाकडून अपेक्षित रक्कम आहे. शासनाच्या अटीनुसारच शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाते. नगर, अकोले, श्रीगोंदा, कर्जत तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे.

**असा आहे फटका**

नगर २ हजार २६३ शेतकरी, १ हजार १०४.३४ हेक्टर आणि झालेले नुकसान ३ कोटी २२ लाख. पारनेर ८६८ शेतकरी, ४५९.४८ हेक्टर आणि झालेले नुकसान १ कोटी २५ लाख. पाथर्डी २४३ शेतकरी, १०६.९० हेक्टर आणि झालेलले नुकसान ३४ लाख. कर्जत १ हजार ८०२ शेतकरी, ७७६.९६ हेक्टर आणि झालेले नुकसान २ कोटी १८ लाख. जामखेड ७१८ शेतकरी २७६.०४ हेक्टर आणि नुकसान ७६ लाख. श्रीगोंदा १ हजार ९८५ शेतकरी, ८९०.५७ हेक्टर आणि नुकसान २ कोटी ५४ लाख. श्रीरामपूर ५२ शेतकरी, ३९.२४ हेक्टर आणि नुकसान १० लाख. राहुरी १ शेतकरी ३६२, ५१३.४८ हेक्टर आणि नुकसान १ कोटी ४१ लाख. नेवासा ५३२ शेतकरी, ३६५.५९ हेक्टर आणि नुकसान १ कोटी २ लाख. शेवगाव ४६ शेतकरी, २० हेक्टर आणि नुकसान ५ लाख. संगमनेर ९६८ शेतकरी, ५२३.६६ हेक्टर आणि नुकसान १ कोटी ७५ लाख. अकोले ५ हजार १६८ शेतकरी, १ हजार ३३६.४३ हेक्टर आणि नुकसान ३ कोटी ६८ लाख. कोपरगाव ७४ शेतकरी ३४.४६ हेक्टर आणि नुकसान ९ लाख. राहाता ९६ शेतकरी, ७४.२९ हेक्टर आणि नुकसान २३ लाख असे आहे.